PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 4, ISSUE 4

# मुक्त विद्यापीठ ; सर्वांगीण विकासाचे शिक्षण

**प्रा. विजय एम घुबले**
M.S.W., M.Phil.
मातोश्री मुंदाफळे समाजकार्य महा.
नरखेड, जि. नागपूर
**महाराष्ट्र भारत**

प्रस्तावना :–

''ज्ञानगंगा घरोघरी'' हे ब्रीद असलेल्या नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने नुकतेच रौप्यमहोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. समाजातील विविध घटकांसाठी विद्यापीठाने तयार कलेल्या विविध शिक्षणक्रमांचे विकसन, वैशिष्टये आणि आतापर्यंतच्या कामगिरीवर प्रकाश टाकणारा हा लेख....

शिक्षणामुळे व्यक्तिचा सर्वांगीण विकास होत असतो. शिक्षणात राष्ट्रीय एकात्मता धर्म, सहिष्णुता, जीवनपद्धती, आर्थिक प्रगमी या तत्वांचा समावेश होतो. शिक्षणामुळे सदगुण आणि सद्प्रवृत्तींचा विकास होतो. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये म्हणून महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक धोरण आखून दि. 1 जुलै 1989 रोजी यशवंतराव चव्हान महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना केली. आज या विद्यापीठाचा वेल आकाशाला गवसणी घालू लागला आहे. संपूर्ण महाराष्ट्र हे या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. समाजातील प्रत्येक वंचित घटकांना शिक्षणदेण्याचे महत्वपूर्ण असे कार्य हे विद्यापीठ गेल्या 24 वर्षापासून यशस्वीपणे करीत आहे. ज्याला जिथे जिथे शिक्षणप हवे, ते त्याला देण्याचे कार्य हे केवळ मुक्त शिक्षणाच्या

चळवळीतून करतो येते. विद्यार्थ्याला त्याच्या सोयीच्या दृष्टिकोनातून जमेल त्या वेळेत शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होते, त्याला मुक्त शिक्षण प्रणाली असे म्हणतात. शिक्षणाची गरज ओळखून विविध अभ्यासक्रम या विद्यापीठाने सुरू केले.

विशेष करून व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांच्या गरजा ओळखून व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

विद्यापीठाचे शिक्षणक्रम आणि पाठयपस्तकांच्या संहिता विकसित करणाऱ्या आठ विद्याशाखांची निर्मिती करण्यात आलेली आहे. या विद्याशाखांमार्फत विविध प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्यत्तर असेएकूण 211 शिक्षणक्रम यशस्वीरित्या चालविले जात आहेत. या शिक्षणक्रमांत विविधता आहे. नाशिक, पुणे मुंबई, नागपूर, कोल्हापूर औरंगाबाद, नांदेड, अमरावती, कल्याण आणि सोलापूर येथे विभागीय केंद्रे कार्यरत आहेत.

पाठयपुस्तकांची निर्मिती :–

विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असणारी पाठयपुस्तके या विद्यापीठाने स्वतःच प्रकाशित केली आहेत. आतापर्यंत 2500 हून अधिक पाठयपुस्तकांची निर्मिती करण्यात आली आहे.

अद्ययावत ग्रंथालय :–

विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात अद्ययावत, सुसज्ज अशा ग्रंथालयाची उभारणी करण्यात आली आहे. ग्रंथालयाची उभारणी करण्यात आली आहे. ग्रंथालयात 44 हजार 579 पुस्तके, 69 जर्नल्य, 3 हजार 971 सीडीज, 296 ऑडिओ कॅसेट्स, 277 व्हिडीओ कॅसेट्स उपलब्ध असून सुमारे 45 हजार ऑनलाईन लाभ देणारे तीन इंटरनॅशनल डाटाबेस आहेत.

अभ्यासकेंद्रे :–

केवळ 15 अभ्यासकेंद्रे आणि 3 हजार 757 विद्यार्थी असलेल्या या विद्यापीठाने गेल्या 24 वर्षात देदीप्यमान कामगिरी केली आहे. 2013 पर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात 4 हजार 200 हून अधिक अभ्यासकेंद्रे, तर विद्यार्थी संख्या पाच लाखांहून अधिक झाली आहे. आजवर 35 लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याची भूमिका या विद्यापीठीने यशस्वीपणेपेलली आहे.

सलग प्रथम स्थान :–

देशभरादतील 198 विद्यापीठे आणि दूरशिक्षण संस्थांचे सर्वेक्षण 'करिअर 306' या मासिकाच्या वतीने करण्यात आले. देशात राज्य पातळीवर काम करणाऱ्या सर्व मुक्त शिक्षण संस्थांमध्ये, यशवंतराव चव्हान महाराष्ट्र मुक्त विद्यापीठे सन 2010 पासून 2012 पर्यंत सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांकाचे स्थान क्रमाकांचे स्थान टिकवून ठेवण्यात यश मिळवले आहे.

आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कार :–

शिक्षणापासून वंचित असणाऱ्या समाज घटकांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी, सुयोग्य असे शैक्षणिक तंत्रज्ञान मोठया प्रमाणात केवळ विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याच्या हेतूने नाही, तर शैक्षणिक तंत्रज्ञानाचा अध्ययन शैलीचा वापर करून टिकाऊ स्वरूपाचे शिक्षण देऊन शैक्षणिक क्रांती केली आहे. म्हणूनच, 'कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग' या जागतिक संघटनेचा अवॉर्ड ऑफ एक्सलन्स' हा पुरस्कार विद्यापीठाला मिळाला आहे.

स्पर्धा परीक्षेत कामगिरी :–

विद्यापीठातून बी. ए. पदवी शिक्षणक्रम पूर्ण करून गतवर्षी, अहमनगर जिल्ह्यातील शेवगाव येथील ईश्वर कातकडे हे 2010–11 मध्ये एम.पी.एस.सी. परीक्षेत राज्यात प्रथम, तर

2011–12 मध्ये झालेल्या एम.पी.एस.सी. परीक्षेत रमेश घोलप हे राज्यात मानाचा तुरा रोवला गेला आहे. अलिकडेच मे 2013 मध्ये, केंद्रिय लोकसेवा आयोगाच्याप वतीने भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत लातूरचा कौस्तुभ दिवेगावाकर देशात पंधरावा व राज्यात प्रथम आला आहे. कौस्तुभनेही याच विद्यापीठातून बी. ए. पदवी शिक्षणक्रम पूर्ण केला आहे. मुक्त शिक्षध प्रणालीद्वारे एम.पी.एस.सी./यू.पी.एस.सी. स्पर्धा परीक्षेत चांगले यश मिळविता येते हे सलग दतीन वर्षापासून सिद्ध झाले आहे. मुक्त विद्यापीठातूनच पदवी शिक्षण घेऊन नाशिकच्या कविता ठोण्गे हिनेही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. याशिवाय, राज्याच्या विविध भागातील पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी एम.पी.एस.सी. आणि यू. पी.एस.सी. स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. या पाश्वभूमीवर, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी पदासाठीचे, भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र (प्री–आय.ए.एस. ट्रेनिंग सेंटर) मुक्त विद्यापीठातच सुरू झाल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

दृक–श्राव्य केंद्र :–

विद्यापीठाच्या शिक्षणक्रमांच्या छापील अध्ययन साहित्याला पूरक असे दृक–श्राव्य साहित्य केंद्रामार्फत विकसित केले जाते. प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अशा विविध स्तरांवरील 319 चित्रफिती आणि 428 ध्वनिफिती केंद्राने विकसित केल्या आहेत.

यशवाणी वेब रेडिओ आणि व्हिडीओ पोर्टल :–

विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार पूरक ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध आहे. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून दृक–श्राव्य केंद्राने निर्माण केलेले कार्यक्रम विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या अधिकृत सकंतस्थळावर उपलब्ध

आहेत. संकेतस्थळाच्या उजव्या बाजूला 'यशवाणी' या लिंकवर क्लिक केल्यास श्राव्य कार्यक्रम विद्यार्थ्यांना ऐकता येतात. दररोज 12 ते 3 या वेळेत ऑडिओ कार्यक्रमांचे इंटरनेटच्या साहाय्याने प्रसारण केले जाते. विद्यार्थ्यांना 'यशवाणी' चा कार्यक्रम ऐकतांना जर काही शंका असेल तर तिचे तात्काळ निरसन करून घेण्यासाठी 0253–22304671, 2230472, 2230473 असे दूध्वनी क्रमांक उपलब्ध आहेत. त्यावर संपर्क करून सविद्यार्थ्याला संबंधित मार्गदर्शकाकडून शंकेचे निरसन करून घेता येते. विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळाच्या डाव्या बाजूला ऑडिओ–व्हिडीओ Learning Content या लिंकवरून व्हिडीओ कार्यक्रम बघता येतो. दृक–श्राव्य केंद्राने निर्मित केलेले 233 व्हिडीओ कार्यक्रम संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यातील यादीत दर्शविल्याप्रमाणे, कार्यक्रमाच्या नावर क्लिक केल्यावर तो व्हिडीओ कार्यक्रम विद्यार्थ्यांना बघता येतो. या दोन्हीही सुविधांमार्फत विद्यार्थी हे दृक–श्राव्य कार्यक्रम कितीही वेळा ऐकू आणि पाहू शकतात.

कृषिविज्ञान केंद्र :–

कृषिविज्ञान प्रत्यक्ष शेतात नेऊन यशस्वी करण्यासाठी 1994 मध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी या विद्यापीठात कृषिविज्ञान केंद्राची स्थापना केली. कष्टकारी, शेतकरी, ग्रामीण युवक–युवतींना कृषितंत्रज्ञानाचे अद्ययावत व्यावसायिक प्रशिक्षण देणे हे सर्वात महत्वाचे कार्य या केंद्रामार्फत केले जाते. शेतकऱ्यांच्या मूलभूत गरजांचा आणि संबंधित प्रदेशातील हवामान, पिके, साधनसामुग्री या बाबींचा बारकाईने विचार करून प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

सहयोग व विशेष उपक्रम केंद्र :–

विद्यापीठाच्या सहयोग व विशेष उपक्रम केंद्रामार्फत विशेष वंचित घटकांसाठी स्वतंत्र शिक्षणक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्यात घरोघरी पेपर वितरण करणाऱ्या मुलांसाठी बी. ए. ग्राहक सेवा, तर विद्यापीठाच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यानांही उच्च शिक्षण मिळावे विद्यमान कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार यांच्या पुढाकाराने सुरक्षारक्षक, सफाई कामगार यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेतले. याबरोबरच बूट पॉलिश करणारे कामगार, मोलकरीण, अंध विद्यार्थी, नगरपालिकेचे सफाई कामगार, कर्करागाचे रूग्ण अशा विविध 25 घटकांसाठी विशेष शिक्षणक्रम सुरू करण्यात आले आहेत. याशिवाय, विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दर्जा अधिक सुधारावा आणि गुणवत्तेत वाढ व्हावी या दृष्टीने विविध शिक्षणक्रमांचे मूल्यमापनही या केंद्रामार्फत केले जाते.

अध्यासने :—

विद्यापीठात कुसुमाग्रज अध्यासन, सावित्रीबाई फुले अध्यासन, वामनदादा कर्डक अध्यासन आणि महात्मा गांधी अध्यासन अशी चार अध्यासने सुरू करण्यात आली आहेत. या अध्यासनांतर्गत त्यांची साहित्य संपदा जतन करून ठेवण्यात आली आहे.

विविध पुरस्कार :—

साहित्य, कला, संगीत, क्रीडा, नाटय, समाजसेवा आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंना दवर्षी विविध पुरस्कार देऊन विद्यापीठातर्फे गौरविण्यात येते. कुसुमाग्राज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार, विशाखा काव्य पुरस्कार, बाबूराव बागुल गौरव पुरस्कार, रूक्मिणी पुरस्कार, श्रमसेवा पुरस्कार, ज्ञानदीप पुरस्कार, डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति पुरस्कार असे वेगवेगळे पुरस्कार देण्यात येतात.

ठळक वैशिष्टयेः—

काम करता–करता शिक्षण, शिक्षणापासून वंचित झालेल्यांना पुन्हा नव्याने शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, प्रमाण शिक्षणक्रमापासून तर संशोधनापर्यंत सर्व शिक्षणक्रम येथे उपलब्ध, बारावीपर्यंत शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही पूर्व परीक्षा देऊन पदवी आणि त्यापुढे संशोधनापर्यंत शिक्षण घेण्याची संधी, अध्ययनासाठी बहुमाध्यमांचा वापर, आवडी व सवडीनुसार स्वतःच्या वतीने शिक्षणक्रम पूर्ण करण्याची संधी, प्रमाणपत्र, पदवी, संशोधन पदव्युत्तर शिक्षण इतर विद्यापीठांशी समकक्ष, अद्ययावत मूल्यमापन पद्धतीद्वारे परीक्षा आयोजन, आकाशवाणी, दूरदर्शन, दृक–श्राव्य चित्रफितींद्वारे घरबसल्या मार्गदर्शन, अध्ययनाच्या संदर्भात लवचिक धोरण, पारंपारिक महाविद्यालयात शिकत असतांना मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रम शिकण्याची संधी.

शिक्षणक्रमांचे विकसन :–

समाजाच्या गरजा ओळखून त्याप्रमाणे शिक्षणक्रमाचे विकसन करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने आठ विद्याशाखा सुरू केल्या आहेत. त्यात मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे, वाणिज्य व व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, विज्ञान व तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, निरंतर शिक्षण, कृषिविज्ञान आणि आरोग्य अशा आठ विद्याशाखांचा समावेश आहे. तसेच शैक्षणिक सेवा विभाग, सहयोग व विशेष उपक्रम केंद्र आणि विविध शिक्षणक्रमांच्या ध्वनिचित्रफितीची निर्मिती करण्यासाठी दृक–श्राव्य केंद्रही कार्यरत आहे.

नवीन शिक्षणक्रम :–

समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहोचावे यासाठी अनेक अभिनव शिक्षणक्रम सुरू करण्यात आलेत. महाराष्ट्रातील भीषण दुष्काळ आणि पाणीटंचाईवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने निरंतर शिक्षण विद्याशाखेमार्फत या शैक्षणिक वर्षापासून ''जल व्यवस्थापन'' प्रमाणपत्र शिक्षणक्रम,

विद्यापीठाच्या आरोग्य विद्याशाखेमार्फत फार्मास्युटिकल कंपन्यांना उपयुक्त असे 100 टक्के नोकरीची हमी देण्यासाठी सिप्ला कंपनीशी करार करून 'डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सायन्स', तर वोक्हार्टसोबत करार करून 'डिप्लोमा इन फार्मा मॅन्युफॅक्चरींग अँड पॅकेजिंग' शिक्षणक्रम, बी.एड्. विद्यार्थ्यांसाठी मूल्यशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम नव्याने सुरू करण्यात आले आहेत.

याबरोबरच रिक्षा, टॅक्सीचालक हे नेहमीच दुर्लक्षित राहिलेले असतात. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून उच्च शिक्षण देऊन समाजात सन्मान प्राप्त करून देण्यासाठी बी. ए. (रोड ट्रान्सपोर्टेशन), शिर्डी संस्थान कर्मऱ्यांसाठी बी. ए. (मंदिर व्यवस्थापन), उद्योग जगताच्या आधुनिक गरजांसाठी सायबर सिक्युरिटी, सप्लाय चेन मॅनेजमेंट, प्रॉडक्शन आणि ऑपरेशन मॅनेजमेंट, बी. कॉम. फायनान्स आणि बँकिंग, मुंबई डबेवाले, लष्करी जवानांसाठी पूर्वतयारी आणि बी. ए. यंत्रमाग कामगरांच्या कौशल्याला समाजमान्यता देण्यासाठी बी.ए. इन टेक्सटाईल, घरोघरी गॅस सिलिंडर वितरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बी.ए. ग्राहकसेवा, महाराष्ट्रपोलिस दउलादतील कर्मचाऱ्यांसाठी तसेच अधिकाऱ्यांसाठी बी. ए. (पोलीस ॲडमिनीस्ट्रेशन) आणि एम.बी.ए. (पब्लिक पॉलिसी अँड मॅनेजमेंट) नेव्हल डॉकयार्ड कर्मचाऱ्यांसाठी अभियांत्रिकी क्षेत्रातील पदविका, सलून व्यवसाय पदविका, बी. एस.सी. (इंडस्ट्रीयल ड्रग्ज सायन्स) आणि एम.पी.एस.सी. /यू.पी.एस.सी. च्या स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याच्या दृष्टीने बी.ए. (पब्लिक सर्व्हिसेस) व एम.ए. (पब्लिक सर्व्हिसेस) हे शिक्षणक्रम सुरू करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे काही शिक्षणक्रम मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमांतही उपलब्ध आहेत. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बी. एस. सी. (इंडस्ट्रीयल सायन्स) तसेच बी.एस.सी. (ड्रग्ज सायन्स) शिक्षणक्रम ल्युपिन फार्मास्युटीकलच्या सहकार्याने सुरू आहे. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनादेखील सी.ए. फर्मच्या साहाय्याने 'कमवा व शिका' योजनेंतर्गत नवा पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे.

'यश निर्माण' प्रकल्प :–

'यश निर्माण' प्रकल्पांतर्गत बोंबिलटेक, सावरगाव, लाडची चिंतामणवाडी ही चार खेडी दत्तक घेऊन विद्यापीठ तेथील गावकऱ्यांना सुशिक्षित करत आहे. तेथील लोकांना आरोग्यविषयक प्राथमिक ज्ञान, वाचन–लिखाणाचे धडे देण्याबरोबरच शेतीविषयक माहिती दिली जाते. ज्यामुळे त्यांचे राहणीमान सुधारेल, आत्मविश्वास वाढेल व ते बदलत्या काळाशी सहजपणे जुळवून घेऊ शकतील.

<u>आदिवासी व ग्रामीण युवकांसाठी उपक्रम :–</u>

नाशिक जिल्ह्यातील बराचसा आदिवासी भाग हा पूर्णपणे दुर्लक्षित आहे. परंतु तिथल्या युवकांना शिकण्याची इच्छा असूनही भौतिक सुविधांमुळे ते "जैसे थे" च राहतात. अशा युवकांसाठी मुक्त विद्यापीठाने 'यश स्वावलंबन योजना' आखली आहे. ज्यांचे शिक्षण दहावी, बारावीपर्यंतच झाले आहे, त्यांची राहण्याची व्यवस्था विद्यापीठातच करून त्यांना कृषीशी सलग्न शिक्षण दिले जात आहे. त्यांना विशिष्ट मानधनही दिले जाते. ज्यातील काही हिस्सा थेट बँकेत मजा होतो. शहरी व ग्रामीण भागातील अल्पसंख्याकांच्या समुदायादतील तरूणांमध्ये कौशल्य आहे, परंतु शिक्षणाअभावी त्यांचा विकास होत नाही, अशा वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्तर उंचवण्यासाठी विद्यापीठ कौशल्याधिष्टीत शिक्षणक्रम लवकरच सुरू करणार आहे.

देशात एकूण 14 मुक्त विद्यापीठे आहेत. राज्यस्तरावर असलेल्या मुक्त विद्यापीठांपैकी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ देशातील राज्य स्तरावरील चौथे मुक्त विद्यापीठ आहे. आज सर्व क्षेत्रांत प्रगती साधून, बदल करून शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्रे, मार्गदर्शक प्राध्यापक, विद्यार्थी या सर्वांच्या सहकाऱ्याने विद्यापीठाने आपले अनोखे स्थान मिळविले आहे. अभ्यासकेंद्रे, पाठयपुस्तकांचा दर्जा, मूल्यामापन, गुणवत्ता, ई–लर्निंगची उपलब्धता, उतीर्ण होण्याचे प्रमाण, व्यवहारातील पारदर्शकता, समाजातील विशेष वंचित घटकांसाठी विशेष शिक्षणक्रम आणि शिक्षण प्रक्रियेला साहाय्यभूत अशी कार्यक्षम व्यवस्था

उभारली आहे. 'ग्लोबली लिंक' होण्यासाठी विद्यापीठाने जागतिक मुक्त विपीठाशी गंगोत्री असलेल्या इंग्लंडमधील मुक्त विद्यापीठाशी तसेच कॅनडा व श्रीलंका येथील विद्यापीठांशी संबंध दृढ केले आहेत. मलेशियातील अनिवासी भारतीयांनाही उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'एडसील' च्या सहकाऱ्याने अलिकडेच शैक्षणिक करार केला आहे. केवळ देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा वेगळा ठसा उमटविण्याचा कुलगुरू डॉ. आर कृष्णकुमार यांचा सततचा ध्यास विद्यापीठाला निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

## संदर्भ ग्रंथ सूची :–

1) योजना सप्टेंबर 2009

2) योजना सप्टेंबर 2013

3) योजना एप्रिल 2014

4) योजना मे 2016

5) यश मंथन एप्रिल–जुन 2016